Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
★Pune-Pimpri-Chinchwad Area★

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.
जा.क्र.झोपुप्रा./तां२/२२२०/२०२४
दिनांक : ११ /०९/२०२४.

# झोपडपट्टी पुनर्वसन योजना (प्रशासकीय मान्यता)

**(विकास नियंत्रण नियमावली झोपुप्रा, २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये)**

<u>प्रस्तावना :</u>

मौजे एरंडवणे टी.पी.स्कीम-१, फायनल प्लॉट नं. २/१, २/४ व ३/१, सि.स.नं. १/१ (स.नं. ८८) येथील १८७३.०७ चौ.मी. क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी विकसक मे. वरद विनायक डेव्हलपर्स यांचेमार्फत ७०.३७% झोपडीधारकांच्या संमतीसह दि.१८/०१/२०२४ रोजी प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे.

१) सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या दृष्टीने विकसकामार्फत दाखल प्रस्तावास अनुसरून या प्राधिकरणामार्फत दि.१९/०८/२०२४ रोजी मंजूर नियमावली २०२२ मधील नियम क्र. १४.६.१२(१) अन्वये "<u>झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र प्रारुप योजना</u>" सदर मिळकतीवरील झोपडीधारकांना व सर्व संबंधितांसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. सदर मिळकतीवरील कोणत्याही झोपडीधारकाची विहीत मुदतीत सदर प्रारुप योजनेसंदर्भात लेखी हरकत/ सूचना अथवा तक्रार प्राधिकरणास प्राप्त झालेली नाही.

२) दि १९/०८/२०२४ रोजी निर्गमित केलेल्या प्रारूप योजनेतील सर्व बाबींचा अंतर्भाव करून सदर प्रारूप योजना अंतिम करण्यात येत असून सदर योजनेस प्रारूप योजनेतील सर्व शर्ती-अटींसह प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. सदर योजनेत आवश्यकतेप्रमाणे होणारे बदल झोपडीधारकांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस /प्रतिनिधींना वेळोवेळी अवगत करणे विकसकावर बंधनकारक राहील.

३) सदर योजनेद्वारे विकसक मे. वरद विनायक डेव्हलपर्स यांना सदर मिळकतीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकरीता या प्राधिकरणाच्या वतीने प्राधिकृत करण्यात येत असून, विकसकांनी झोपडपट्टी पुनर्वसन अधिनियमातील व नियमावली २०२२ मधील तरतूदीस अधिन राहून योजनेची अंमलबजावणी करणे अनिवार्य राहील. सदर योजना राबविण्यासाठी अपेक्षित असलेले सर्व व्यवस्थापन व होणाऱ्या खर्चाची संपूर्ण जबाबदारी विकसकाची राहील.

४) सदर योजनेचे विकसक मे. वरद विनायक डेव्हलपर्स यांनी सदर मिळकतीवर विहित मुदतीत प्रकल्प सुरू करणे, बांधकाम व प्रकल्प पूर्ण करणे बंधनकारक राहील. योजना अंमलबजावणी संदर्भातील शासनाचे तसेच अन्य सर्व संविधानिक प्राधिकरणे व झो.पु.प्राधिकरणाचे सर्व नियम लागू राहतील.अशा सर्व प्राधिकरणाकडून देण्यात येणाऱ्या निर्देशांचे/आदेशाचे अनुपालन करणे विकसकावर बंधनकारक राहील.

५) फा. प्लॉ. क्र. २/१ व २/४ या मिळकतीचे विकसन हक्क मे. वरद विनायक डेव्हलपर्स यांना प्राप्त असून, सदर मिळकतीवर द सारस्वत को. ऑप. बँक लि. यांचा बोजा असल्याचे दिसून येते. तथापि झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील पुनर्वसन घटकांतर्गत निर्माण होणाऱ्या व

वाटप करण्यात येणाऱ्या सदनिकेबाबत व पुनर्वसन इमारतीबाबत/जमिनीबाबत कोणताही बोजा राहणार नाही याबाबत सारस्वत को. ऑप. बँकेचे नाहरकत प्रमाणपत्र बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यापूर्वी विकसक यांनी सादर करणे बंधनकारक आहे.

६) झोपडपट्टी अधिनियमातील कलम ३(ड) अन्वये झोपडपट्टी निर्मुलनाचे आदेश पारीत झाल्यानंतर व अट क्र. ५ ची पूर्तता झालेनंतर योजनेसंदर्भात प्राप्त होणाऱ्या बांधकाम प्रस्तावास अनुसरून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ४५ अन्वये विकास/बांधकाम परवानगी (Commencement Certificate) देणेसंदर्भात स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

७) योजना क्षेत्रातील फा. प्लॉट क्र. ३/१ मधील ९२१. ६६ चौ. मी. क्षेत्राच्या मालकी हक्कासंदर्भात श्रीमती. शैला बेंद्रे, श्रीमती. क्षितिजा बेंद्रे व श्री. अंजनेय पाटणकर यांच्याकडून प्राप्त हरकत अर्जाबाबत दि.२६/०६/२०२४ रोजी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने निर्णय घेतला असून, याबाबत विकासकाने दि.२८/०६/२०२४ रोजी क्षतीपुर्ती पत्र सादर केले आहे. सदर निर्णयाचे विरुद्ध श्री. अंजनेय दिलीप पाटणकर यांनी मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे यांचे कडे अपिल क्र. ३८/२०२४ दि.०७/०८/२०२४ नुसार अपिल दाखल केले आहे. सदर प्रकरणी मा. शिखर तक्रार निवारण समिती, वांद्रे यांचेमार्फत स्थगिती/जैसे थे आदेश देण्यात आलेले नाहीत. सबब वरील अपिलाचे निर्णयाचे अधीन राहून, जमीन मालकीशी संबंधित विवादांचे निराकरण विकसकाने करणे आवश्यक राहील, या शर्तीसह सदर योजनेस विकास नियंत्रण नियमावली, २०२२ मधील नियम क्र.१४.६.१२(१) अन्वये झोपडपट्टी पुनर्वसन योजना अंतिम प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

प्रस्तुत निर्णय सर्व संबंधितांवर बंधनकारक राहील आणि त्या संदर्भात अपील दाखल करावयाचे झाल्यास ते मा. शिखर तक्रार निवारण समिती (Apex Grievances Redressal Committee) कडे दाखल करता येईल, याची नोंद घ्यावी.

सदर प्रशासकीय मान्यता ही माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह जारी करण्यात येत आहे.

Slum Rehabilitation Authority Technical Department APPROVED Pune-Pimpri-Chinchwad Area

मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

स्थळ :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.
दिनांक :- ११ /०९/२०२४

प्रत माहितीस्तव :

१. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका.
२. विकसक - मे. वरद विनायक डेव्हलपर्स, ३०६, आयफेल स्क्वेअर, टिळक रोड, पुणे - ४११०३०
३. मौजे - एरंडवणे टी.पी.स्कीम-१, फायनल प्लॉट नं. २/१, २/४ व ३/१, सि.स.नं. १/१ (स.नं. ८८), पुणे येथील झोपडपट्टीधारकांकरीता माहितीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत उपलब्ध करून देण्यात येत आहे.